कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापण करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता समिती गठीत करण्याबाबत. (समितीस मुदतवाढ देणेबाबत)

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रक्रिया१११७/प्र.क्र.२१८/९-स
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०८ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांकः प्रक्रिया१११७/प्र.क्र.२१८/९-स, दि. ३.११.२०१७

२) पणन संचालनालय पत्र क्र. पणन-२/कृप्रससं/गठीत समिती/२०१८/११५, दि.०९.०१.२०१८ चे पत्र

प्रस्तावना :-

कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापण करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता वाचा मधील क्र. १ च्या शासन निर्णयान्वये समिति गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीस आपला अहवाल सादर करण्याकरिता ६० दिवसांचा कालावधी देण्यात आलेला होता. सदर कालावधी दि. २.०१.२०१८ रोजी संपुष्टात आलेला आहे. तद्नुषंगाने सदर समितीस अहवाल सादर करण्याकरिता २ महिन्याची मुदतवाढ देण्याबाबत वाचा मधील क्र. २ च्या पत्रान्वये पणन संचालक यांनी शासनास विनंती केली आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नसल्यामुळे, समितीस २ महिन्याची मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांचा अभ्यास करुन या संस्थांच्या कामकाजाचे योग्य मुल्यमापण करणे व त्यामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय दि.०३.११.२०१७ नुसार गठीत समितीस आपला अहवाल/शिफारशी सादर करण्याकरिता दिनांक ०२.०१.२०१८ पासुन २ महिन्याची (दि.०२.०३.२०१८ पर्यंत) अंतीम मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. वरील सुधारणे व्यतिरिक्त शासन निर्णयातील अन्य अटी व शर्ती कायम आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०८११३१३०९९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahendra Shantaram Pujari

Digitally signed by Mahendra Shantaram Pujari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMTD DEPARTMENT, postalCode=400012, st=Maharashtra, 2.5.4.20=16153bd1d85632a421d5a5fd23bf5e5bb624d27f2c8cf59fb17e3ead3a034dbc, cn=Mahendra Shantaram Pujari
Date: 2018.02.08 11:37:50 +05'30'

(महेंद्र पुजारी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा.विरोधी पक्ष नेते विधानसभा व विधानपरिषद

२.सर्व मा. विधानसभा व विधानपरिषद सदस्य

३.मा. मंत्री (पणन) व मा. राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव.

४. मा. प्रधान सचिव (कृषी व पणन) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.

६.उप सचिव (पणन विभाग) यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.

७.पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८.सह संचालक, (प्रक्रीया) पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

९.सह निबंधक तथा महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

१०.उप संचालक (कृषी प्रक्रिया), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

११.उप संचालक, उद्योग विकास महामंडळ, आरे मिल्क कॉलनी, दिनकर देसाई मार्ग, गोरेगांव, मुंबई ४०० ०६५

१२. उप संचालक (प्रक्रिया), पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१३. निवडनस्ती.